पुढारी

पा. नं. ५

# वेश्याव्यवसायासाठी मुली पुरवणाऱ्या दलालाला अटक

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर परिसरात वेश्या व्यवसायासाठी अल्पवयीन मुली पुरवणाऱ्या महिला वेश्या दलालावर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाने छापा टाकून वेश्या दलाल महिलेला अटक केली आहे. तिच्या तावडीतून १ अल्पवयीन व २ प्रौढ पिडित मुलींची सुटका करण्यात आली आहे.

## १ अल्पवयीन, २ प्रौढ पीडित मुलींची सुटका

मिरा-भाईंदर व इतर ठिकाणी महिला वेश्यादलाल ही वेश्याव्यवसाय करत असून ती व्हॉटसअॅपव्दारे पुरुष गिऱ्हाईकांना अल्पवयीन व प्रौढ मुलींचे फोटो पाठवुन, वेश्यागमनासाठी अल्पवयीन व प्रौढ मुली पुरवत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाला मिळाली. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने बोगस गिऱ्हाईक व दोन पंच बोलावुन महिला वेश्यादलाल हिने सांगितल्याप्रमाणे अॅक्या फॅमिली रेस्ट्रो बार, निरा कॉम्पलेक्स, न्यु गोल्डन नेस्ट, भाईंदर पूर्व या ठिकाणी छापा टाकला. या छाप्यात महिला वेश्यादलाल हिने १ अल्पवयीन मुलगी व २ प्रौढ मुलींना पुरुष गिऱ्हाईकास वेश्यागमनासाठी घेऊन आली होती. पोलीस पथकाने तिला सापळ्यातील रोख रक्कम व इतर मुद्देमालसह ताब्यात घेण्यात आले. तिने आणलेल्या १ अल्पवयीन व २ प्रौढ पिडित अशा ३ मुलींची सुटका केली आहे. महिला आरोपी वेश्यादलाल हिच्याविरुध्द नवघर पोलीस ठाण्यात विविध कलमांतर्गत शुक्रवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, मिरा-भाईंदर परिसरात वेश्या व्यवसायात वाढ होत असून यामुळे परिसरातील सामाजिक वातावरण गढूळ होत आहे.

पु. पा. ४.

# खुनातील आरोपी उत्तर प्रदेशातून ताब्यात

**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

कांदिवली पूर्वेत राहणाऱ्या सुधीर कुंजबिहारी सिंग याचे अपहरण करुन खून करणारा मुख्य आरोपी राहुल पाल ऊर्फ मर्दा याच्या मुसक्या आवळत पेल्हार पोलिसांनी उत्तर प्रदेशमधून त्याला ताब्यात घेतले.

**पेल्हार पोलिसांची कारवाई**

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीतील गौराईपाडा, संतोषभवन येथून १२ जानेवारीच्या मध्यरात्री रोहन सिंग, राहूल पाल उर्फ मर्दा यांच्यासह इतर सहा ते सात जणांनी सुधीर कुंजबिहारी सिंग, (२७) रा. कांदीवली पूर्व, मुंबई यास रिक्षात जबरदस्तीने टाकून मारहाण करत घेऊन जाऊन धारधार हत्याराने जिवे ठार मारल्याची तक्रार वैभव रमेश मिश्रा, (२८ )वर्षे, रा. संतोष भुवन यांनी केली होती. या तक्रारी वरुन पेल्हार गुन्हे शाखेकडून तपास सुरू करण्यात आला होता या पथकाचे अधिकारी अंमलदार यांनी तांत्रिक माहितीच्या व सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे सुरज लल्लन चव्हाण, (२५) साहिल तिलकु विश्वकर्मा, वय २१ वर्ष, अखिलेश सुनिल सिंग ऊर्फ अक्की वय २७ वर्ष सर्व रा. संतोषभवन नालासोपारा पूर्व यांना सिंहगड, पुणे येथून १३ जानेवारी रोजी अटक केली होती. मात्र हा गुन्हा घडल्यापासून मुख्य आरोपी राहुल पाल ऊर्फ मर्दा हा फरार झाला होता. त्याचा माग काढत पेल्हार पोलीस उत्तरप्रदेश येथील भदोई जिल्ह्यातील चौरीबाजार या ठिकाणी जाऊन पाल ची माहिती प्राप्त करुन रामपुर जि. जौनपुर येथे असल्याचे हुडकून काढले आणि रामपूर पोलीसांच्या मदतीने साकरी या गावात रात्रीच्यावेळी पोलीसांची चाहुल लागल्याने तो जंगलात पळून जात असताना त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेऊन अटक केली आहे.याप्रकरणी गुन्हा नोंद झाली असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

ही कारवाई गुन्हे शाखेच्या कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक सहा.पोलीस निरीक्षक सोपान पाटील, पोलीस उपनिरीक्षक तुकाराम भोपळे, हवालदार योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अविनाश देसाई, फिरोज तडवी, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, रवि वानखेडे, संजय मासाळ, मिथुन भोईर, तिखील मंडलिक, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील, नेम. पेल्हार पोलीस ठाणे तसेच नामदेव ढोणे, सोहेल शेख परीमंडळ-३ यांनी यांच्यासह आदींनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

CamScanner

सामना पा.नं. ५.

# वसईतील जुना खाडी पूल झाला धोकादायक

**▮ कठडे तुटले ▮ पिलरला तडे ▮ प्रवाशांचा जीव टांगणीला**



वसई, दि. २९ (सा.वा.) - रहदारीच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेला वसईतील जुना खाडी पूल धोकादायक झाला आहे. या पुलाचे कठडे तुटले असून पिलरलाही तडे गेले आहेत. त्यामुळे प्रवाशांचा जीव अक्षरशः टांगणीला लागला आहे. याच ठिकाणी नवा पूल बांधण्यात यावा अशी मागणी शिवसेनेने (उद्धव बाळासाहेब ठाकरे) केली असून त्यासाठी पाठपुरावाही सुरू झाला आहे. दरम्यान अंबाडी रेल्वे उड्डाणपूलदेखील धोकादायक झाल्याने तो लवकरच नव्याने उभारला जाणार आहे. त्यावरील वाहतूक पुढे खाडीपुलावरूनच जाणार असल्याने प्रवाशांचा जीव धोक्यात येणार आहे. त्यामुळे जुना खाडीपूलही नव्याने बांधावा लागणार आहे.

वसईतील पूर्व व पश्चिमेला जोडणाऱ्या जुन्या अंबाडी पुलाजवळ चिमाजी आप्पा उद्यान आहे. या बाजूला लागूनच पूर्वेच्या भागात ये-जा करण्यासाठी मुख्य रस्त्यावर खाडी पूल तयार करण्यात आला आहे. या पुलावरून दररोज मोठ्या संख्येने वाहने ये-जा करतात. सुरुवातीला या पुलाची देखभाल व दुरुस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून केले जात होते. परंतु त्यानंतर हा खाडी पूल महापालिकेकडे हस्तांतरण करण्यात आला आहे.

▮ पुलाची होत असलेली दुरवस्था लक्षात घेता त्याचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावे यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्र दिले होते. मात्र त्याकडे दुर्लक्ष झाले.

▮ अजूनही या खाडी पुलाची स्थिती तशीच धोकादायक आहे. या पुलावरून वाहनचालक स्वतःचा जीव धोक्यात घालून गाड्या चालवतात. महापालिकेने जुना खाडी पूल नव्याने बांधावा, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे वसई तालुकाप्रमुख राजाराम बाबर यांनी केली आहे.

लोकमत पु. पा ४.


२० रुपयांच्या पावतीऐवजी १०० रुपयांची वसुली

# आठवडे बाजारात शेतकरी, व्यापाऱ्यांची लूट

लोकमत न्यूज नेटवर्क

पारोळ : वसई महापालिका हद्दीत असलेल्या मांडवी आठवडे बाजारात कर वसुली ठेकेदाराकडून जास्त कर वसूल केला जात असल्याचा आरोप व्यापारी वर्गाने केला आहे. २० रुपयांची पावती असताना पाच पावती देत दुकानदारांकडून चक्क १०० रुपये वसूल केले जात असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

आठवडा बाजारात गृहोपयोगी वस्तू व जीवनावश्यक वस्तूंची विक्री करण्यासाठी फेरीवाले बसतात. या फेरीवाल्यांकडून पालिका बाजार कर वसूल करते. कर वसुलीसाठी प्रत्येक विभागात कंत्राटदार नेमले आहेत. त्यांना कराची रक्कम निर्धारित करून दिली आहे, मात्र काही कंत्राटदार मनमानी करून निर्धारित रकमेपेक्षा असल्याचा आरोप व्यापारी करत आहेत.




## शेतकऱ्यांनाही जास्त कर

या बाजारात वसई, वाडा, भिवंडी, पालघर या तालुक्यातील शेतकरी शेतमाल विक्रीसाठी येत आहेत, पण त्यासाठी करात कोणतीही सवलत दिली जात नाही. उलट त्यांच्याकडून जास्त कर घेतला जातो. लहान टोपलीला पाच रुपये कर असताना २० रुपये कर वसुली केली जात आहे. तर वाहनातून माल विकल्यास १०० रुपये कर असताना त्यांच्याकडून १५० ते २०० रुपये घेतले जात आहेत. यावर पालिकेचे नियंत्रण नसल्याचा आरोप व्यापारी वर्गाने केला आहे. निश्चित किमतीपेक्षा जास्त वसुली करणे हा गुन्हा असून महापालिका हद्दीत भरणाऱ्या आठवडे बाजारात शेतमाल विकण्यासाठी येणाऱ्यांना याचा भुर्दंड सहन करावा लागत आहे.

## मांडवी बाजारात सुविधांचा अभाव

मांडवी आठवडे बाजारात जास्त कर वसूल केला जात असला तरी व्यापारी वर्गाला देण्यात येणाऱ्या सुविधांचा अभाव आहे. या बाजारात असलेल्या शौचालयात पाणी व दरवाजे नसल्याने महिला व्यापाऱ्यांचे हाल होत आहेत. त्यांना उघड्यावर जावे लागत असल्याने आम्ही कर जास्त कर का भरावा, असा प्रश्न त्यांनी महापालिकेला विचारला आहे.

## आम्हाला आर्थिक फटका बसतो

आम्ही आमच्या शेतात सफेद कांद्याचे पीक घेतले असून ते विक्रीसाठी दरवर्षी मांडवी बाजारात येतो, मात्र आम्हाला २० रुपयांची एक पावती न देता पाच पावत्या देऊन शंभर रुपये वसूल केले जातात. यामुळे आम्हाला आर्थिक फटका बसत.आहे.

- कस्तुरी पाटील, महिला शेतकरी

# तरुणाच्या मृत्यूप्रकरणी गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : गावराईपाड्याच्या दुर्गानगर परिसरात राहणाऱ्या आनंद गौंड (२३) या तरुणाच्या अपघाती मृत्यूप्रकरणी शैलेश कानोजिया (२८) याच्याविरोधात गुरुवारी मांडवी पोलिसांनी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे.

मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील खानिवडे टोल नाक्याजवळ भारोळ गावाच्या हद्दीत शैलेश याने दुचाकी निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवल्याने दुचाकी स्लिप होऊन अपघात झाला. यात स्वत शैलेशला दुखापत झाली तर आनंद याला गंभीर दुखापत झाल्याने मृत्यू झाला.

CamScanner

पुण्यनगरी पु.पा.१

# १६ लाखांचे मोबाईल चोरणाऱ्या आरोपीला अटक

**मीरारोडः** भाईंदर पश्चिमेला मोबाईल दुकान फोडून त्यातून सोळा लाखांपेक्षा अधिक किमतीचे मोबाईल चोरी करणाऱ्या आरोपीला दिल्ली येथून अटक केली आहे.तर ट्रक चोरी करणाऱ्या आरोपीला गुन्हे शाखा कक्ष-१, काशिमीरा यांनी अटक केली आहे.मोबाईल चोरी करणाऱ्या आरोपीकडून १४,५६,३०० रुपयांचा मुद्देमाल तसेच दुसऱ्या घटनेतील चोरी गेलेला ट्रक जालना येथून हस्तगत करण्यात आला आहे.

भाईंदर पश्चिमेला असलेल्या चिराग जगदीश अनडा यांच्या मोबाईल शॉपीमधून अज्ञात चोरट्याने १६,७१,३०० रुपये किंमतीचे नवीन मोबाईल चोरी केल्याबाबत भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच १२ मार्च २०२४ रोजी भोलानगर जवळ, उत्तन रोड, भाईंदर पश्चिम येथून फिर्यादी सुरेश त्रिंबक मंजुरकर यांच्या मालकीचा ३,००,००० रु. किमतीचा एक डंपर अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याबाबत भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा या गुन्ह्याचा समांतर तपास करत असताना पडताळणी केलेल्या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे मिळालेल्या माहितीवरुन हा गुन्हा करणारा आरोपी फिरोज ऊर्फ मोनू खान रा. बांद्रा पश्चिम हा असल्याचे निष्पन्न झाले.त्यास दिल्ली येथून अटक करण्यात आली आहे. ट्रक चोरीच्या तपासात गुन्हयाच्या घटनास्थळापासून चोरी करणारा तो ट्रक घेवून जात असलेल्या भाईंदर ते परभणी मार्गावरील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करुन चोरी गेलेला डंपरचा देवाशिष पेट्रोल पंप परभणी पर्यंत शोध घेतला. त्यानंतर परिसरातील वाहन चोरीचे गुन्हे करणाऱ्या आरोपीची माहीती गोळा केली. त्यातील आरोपी वैजनाथ लक्ष्मण लांडगे ( ६७) रा. साईबाबा नगर, परभणी यांचा संशय आला. त्याबाबत चौकशी केली असता गुन्हा त्यानेच केल्याचे निष्पन्न झाले. आरोपी वैजनाथ लक्ष्मण लांडगे याचा शोध घेतला असता त्याचा मोटार अपघात होवून तो गंभीर जखमी झाल्याने परभणी येथे हॉस्पिटल मध्ये अॅडमिट आहे. आरोपी याने हा डंपर चंद्रकांत गणपतराव जाधव रा. जालना यांना विक्री केला होता.

लोकमत पु.पा.४.

# नेपाळी रखवालदाराचा बंगल्यात चोरीचा प्रयत्न

**लोकमत न्यूज नेटवर्क**
**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेस मॅक्सस मॉलजवळील रसेश इमारतीमागे आशीर्वाद नावाचा वकील स्वप्निल दिलीप नाईक यांचा बंगला आहे.

या बंगल्यात नेपाळी रखवालदाराकडून चोरीचा प्रयत्न झाल्याचे उघड झाले आहे. नाईक कुटुंब गावी गेले असताना येथील एका पुजाऱ्याने कॉल करून बंगल्याच्या मागील गेस्ट रूमचा दरवाजा उघडा असल्याचे कळविले. नाईक कुटुंब परत आले असता गेस्ट रूमच्या खिडकीची स्लायडिंग वाकविलेली होती.

## गुन्हा दाखल

आतील टेबलच्या खणातील सामान काढलेले होते; परंतु बंगल्यात मात्र चोरीला काही गेले नव्हते. नाईक यांनी बंगल्याच्या रखवालीसाठी ठेवलेला नेपाळी रखवालदार प्रेम ठाकूर (रा. बतुलसेन, आचम, नेपाळ) हा पसार झालेला होता व त्याचा मोबाईल बंद येत होता. नाईक यांच्या फिर्यादीवरून भाईंदर पोलिस ठाण्यात नेपाळी रखवालदारावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार गायकवाड तपास करीत आहेत.

# पालिकेच्या बसचालकास मारहाण; दोघांवर गुन्हा

## भाईंदर पश्चिम येथील घटना

**लोकमत न्यूज नेटवर्क**
**मीरा रोड :** मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेतील बस चालकास बसमध्ये शिरून मारहाण करणाऱ्या एका महिलेसह तरुणावर भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्या दोघांनी सरकारी कामात अडथळा निर्माण केला.

२८ मार्च रोजी सायंकाळी चौक येथून भाईंदर पश्चिमेस रेल्वेस्थानकाकडे महापालिका परिवहन सेवेची बस घेऊन चालक दिनकर थोरात (वय ५, रा. साईकृपा कॉम्प्लेक्स, काशीगाव) हे येत होते. सायंकाळी वाहतूक कोंडी होत असताना भाईंदर पश्चिमेस बालाजी नगर नाक्यावर सांयकाळी ६:२० च्या सुमारास युनियन बँकेसमोर बसला ओव्हरटेक करून आचल श्रेयांस कोटाडिया (वय ३९, रा. प्लॅनेटेरिया कॉम्प्लेक्स, भाईंदर) या महिलेने तिची दुचाकी बससमोर आडवी.उभी केली.



## सरकारी कामात आणला अडथळा

बसच्या डाव्या दरवाजातून आत येऊन तिने चालक थोरात यांच्या कानाखाली मारून कॉलर पकडून शिवीगाळ केली, तसेच अमित परमानंद दुबे (वय २८) यानेदेखील थोरात यांना शिवीगाळ केली. फिर्यादीनुसार भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सरकारी कामात अडथळा आणण्यासह विविध कलमांनुसार कोटाडिया व दुबे यांच्यावर गुन्हा दाखल असून, पोलिस अधिक तपास करत आहेत.

CamScanner

लोकमत पु.पा.३.



भाईंदरमधील दुकान फोडून १६ लाख ७१ हजार रुपये किमतीचे मोबाइल चोरणाऱ्या आरोपीला मीरा-भाईंदर गुन्हे शाखेने दिल्लीतून अटक केली आहे.

# साडेसोळा लाखांचे मोबाइल चोरणारा दिल्लीतून अटकेत

## भाईंदर येथील दुकानातून केली होती चोरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदरमधील दुकान फोडून त्यातून १६ लाख ७१ हजार रुपयाचे मोबाइल चोरणाऱ्याला मीरा-भाईंदर गुन्हे शाखेने दिल्लीतून अटक केली आहे. त्याच्याकडून चोरलेल्या २४ मोबाइलपैकी १४ लाख ५६ हजार रुपयांचे २२ मोबाइल हस्तगत केले आहेत.

खाऊगल्ली, अल्पेश इमारतीत चिराग अनडा यांचे मोबाइलचे दुकान आहे. चोरट्याने दुकानाचे पश्चिम भिंतीलगत असलेले लोखंडी ग्रील व प्लाय तोडून त्यावाटे दुकानात शिरून १६ लाख ७१ हजर रुपयांचे नवे २४ मोबाइल चोरून नेले होते. भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता.

उपायुक्त अविनाश अंबुरे व स.आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्ह्याचा तपास मीरा-भाईंदर गुन्हे शाखा कक्ष-१ चे पोलिस निरीक्षक अविराज कुराडे, सहायक निरीक्षक प्रशांत गांगुर्डे व पुष्पराज सुर्वेसह राजू तांबे, संदीप शिंदे, अविनाश गर्जे, संजय शिंदे, संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा, सचिन हुले, सचिन सावंत, विजय गायकवाड, समीर यादव, सुधीर खोत, विकास राजपूत, प्रशांत विसपुते, सनी सूर्यवंशी, गौरव बारी, सौरभ इंगळे, धीरज मंगाणे, संतोष चव्हाण यांचे पथक करीत होते.

### २४ पैकी २२ मोबाइल केले हस्तगत

- पोलिस पथकाने तपासात घटनास्थळासह अनेक ठिकाणच्या सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी केली. त्याचे तांत्रिक विश्लेषण करण्यासह खबऱ्यांमार्फत माहिती गोळा करण्यास सुरुवात केली. पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनंतर गुन्हा करणारा आरोपी हा फिरोज ऊर्फ मोनू नईम खान (वय २९, रा. बांद्रा पश्चिम) असल्याचे निष्पन्न झाले.
- फिरोज हा मूळचा उत्तर प्रदेशच्या बिजनौर, तहसील नजिबाबादमधील अकबराबाद गावचा आहे. तो गावी असल्याची माहिती मिळाल्याने पोलिस पथक त्याच्या तपासासाठी उत्तर प्रदेशच्या बिजनौर येथे गेले. मात्र, तेथे तो सापडला नाही. तपासात फिरोज हा दिल्ली येथे गेल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पथक दिल्लीत पोहोचले. स्थानिक पोलिसांच्या मदतीने गुन्हे शाखेने त्याला दिल्लीतून अटक केली.
- त्याने भाईंदर येथील मोबाइल दुकान फोडून चोरलेल्या २४ मोबाइलपैकी २२ मोबाइल पोलिसांनी त्याच्याकडून हस्तगत केले. त्यांची किंमत १४ लाख ५६ हजार ३०० रुपये इतकी आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक सूर्यकांत नायकवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास भाईंदर पोलिस करीत आहेत.

# आई, मुलीला मारहाण करणाऱ्या दोघींवर गुन्हा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** आई व मुलीला मारहाण करणाऱ्या दोघींवर मीरा रोड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिस तपास करत आहेत.




मीरा रोडच्या बेव्हर्ली पार्क, तमिळ चर्चशेजारी रविराज पाम इमारतीत राहणाऱ्या गजाला आफताब मलिक(५०) या रात्रीच्या वेळी इमारतीच्या आवारात मैत्रिणी हिना काझी, सुलताना मुल्ला, निशा, समीरा खान अशा मिळून गप्पा मारत होत्या. त्यावेळी त्याच इमारतीत राहणाऱ्या पुनिता करनी शर्मा (४१) व त्यांची मुलगी नंदिनी (वय २३) या दोघी इमारतीखाली आल्या. नंदिनी ही बसलेल्या महिलांचे मोबाइलमधून शूटिंग काढत असल्याचे पाहून निशा यांनी तिला विचारणा केली. तिला नंदिनीने उद्धट उत्तर देत मोबाइल गाजला यांच्या चेहऱ्याकडे नेला.

- गाजला यांनी शूटिंगला विरोध केला असता नंदिनी व आई पुनिता यांनी त्यांना ठोश्याबुक्क्यांनी मारहाण सुरु केली.
- आईला वाचवण्यासाठी त्यांची मुलगी इन्शा (वय २३) ही धावून आली असता तिलासुद्धा दोघींनी मारहाण केली.
- तर नंदिनी हिने गजाला यांच्या खांद्यावर चावा घेत जखमी केले. याप्रकरणी मीरा रोड पोलिसांनी पुनिता व नंदिनीवर गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

पु.पा.२

...पोलिस कर्मचारी.

# हत्येतील फरार मुख्य आरोपीला यूपीतून अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** हत्येच्या गुन्ह्यातील फरार मुख्य आरोपीला पेल्हारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलिसांनी यूपीतून अटक केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी प्रवीण बनगोसावी यांनी शुक्रवारी दिली आहे.

कांदिवलीच्या मारुती चाळीत राहणारा सुधीर सिंग (२७) आणि वालईपाडा रोडवरील उपाध्याय चाळीत राहणारा वैभव मिश्रा (२८) हे दोघे १२ जानेवारीला गौराईपाडा परिसरात रूम बघण्यासाठी गेले होते. यावेळी आरोपींनी त्याचे अपहरण करून गौराईपाडा परिसरातील यादवेश विद्यालयाच्या बाजूला असलेल्या पार्किंगच्या मोकळ्या जागेत अंगावर कोयता, इतर हत्याराने वार करून बांबू व लाथाबुक्यांनी मारहाण करून ठार मारले होते. याप्रकरणी पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली होती. पेल्हारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी आरोपी सूरज चव्हाण (२५), साहिल विश्वकर्मा (२१) आणि अखिलेश सिंग (२७) या तिन्ही आरोपींना १२ जानेवारीला पुण्याच्या सिंहगड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आनंदनगर परिसरातून पळून जात असताना पाठलाग करून पकडले होते. पण या गुन्ह्यातील मुख्य आरोपी राहुल पाल ऊर्फ मर्दा हा फरार झाला होता.

## जंगलात पळून जाताना केले जेरबंद

आरोपी राहुलचा शोध घेण्यासाठी वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांनी आदेश दिले होते. आरोपी हा उत्तर प्रदेश येथे असण्याची शक्यता असल्याने पेल्हार पोलिस शोध घेण्यासाठी भदोई येथे गेले. चौरीबाजार येथे आरोपीबाबत माहिती घेऊन तो रामपूर येथे असल्याचे समजले. त्यानुसार पोलिस पथकाने तत्काळ रामपूर येथील पोलिसांच्या मदतीने आरोपीचा साकरी या गावात शोध घेत होतला. तो जंगलात पळून जाताना पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन अटक केली आहे.

## यांनी केली कामगिरी

ही कामगिरी पोलिस उपायुक्त जयंत बजबळे, सहायक पोलिस आयुक्त बजरंग देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली पेल्हारचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) कुमारगौरव धादवड, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि सोपान पाटील, पोउपनिरी तुकाराम भोपळे, पोहवा योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अविनाश देसाई, फिरोज तडवी, अनिल शेगर, वाल्मीक पाटील, रवि वानखेडे, संजय मासाळ, मिथुन भोईर, निखील मंडलिक, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील आदींनी पार पाडली आहे.

लोकमत पु.पा.३



# मुलीचे अपहरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** धानिवबागच्या राशीद कंपाउंड परिसरात राहणाऱ्या १४ वर्षांच्या अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याची घटना घडली आहे.बुधवारी सकाळी ती परीक्षा देऊन घरी परत येत असताना धानिवबागच्या रिक्षा स्टॅण्डवरून निघून गेली. ती अद्यापपर्यंत घरी परतली नाही. घरच्यांनी आजूबाजूला शोध घेतला; पण ती सापडली नाही. आरोपीने तिच्या अज्ञानपणाचा फायदा घेऊन तिला कशाचे तरी आमिष दाखवून पळवून नेल्याची तक्रार तिच्या आईने गुरुवारी पेल्हार पोलिस ठाण्यात देऊन गुन्हा दाखल केला आहे.

# मीरा रोडच्या ऑर्केस्ट्रा बारमध्ये अश्लील नाच

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोडच्या शांतीनगर सेक्टर-११ येथील शांती प्लाझा इमारतीत असलेल्या न्यू अण्णा पॅलेस या ऑर्केस्ट्रा बारवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेने व नयानगर पोलिसांनी धाड टाकून तेथे चालणार अश्लील नाचचा प्रकार उघडकीस आणला आहे.

या बारमध्ये बेकायदेशीरपणे तसेच बंदी असूनही तरुणींना अश्लील नाच करायला लावले जात असल्याच्या माहितीवरून पोलिसांनी धाड टाकली. याप्रकरणी बार व्यवस्थापक प्रवीण शेट्टी, रोखपाल प्रजनेस शेट्टी, वेटर शिवकुमार पासवान, धीरजकुमार यादव, देवनंदन यादव, कमलेशकुमार यादव, ऑर्केस्ट्रा वादक ब्यासमुनी चौहान अशा ७ जणांवर नयानगर पोलिस ठाण्यात २७ मार्च रोजी अश्लील नृत्यावर प्रतिबंध व महिलेच्या प्रतिष्ठेचे संरक्षण अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक निरीक्षक विनायक जाधव हे तपास करत आहेत.

पु.पा.२.

# गावठी दारूची भट्टी उद्ध्वस्त; एकाला अटक

## पेल्हार पोलिसांनी केली धडक कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पोलिस ठाणे हद्दीतील अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांनी आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने पेल्हार पोलिस ठाण्याच्या हद्दीत डोंगरावर झाडा-झुडुपांत बिलालपाडा संतोषभवन येथे अवैधरीत्या सुरू असलेली गावठी दारूची हातभट्टी पेल्हार पोलिसांनी उद्ध्वस्त केली असून, या प्रकरणी एकाला अटक केली आहे.

पेल्हारचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांनी स्वतः गुन्हे प्रकटीकरण पथकासह शुक्रवारी पहाटे ६ वाजण्याच्या सुमारास डोंगरावर बिलालपाडा संतोषभवन येथे जाऊन छापा मारला. आरोपीवर पेल्हार पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद केला आहे.



## दारूसाठीची सामग्री केली उद्ध्वस्त

■ गावठी दारूसाठी तयार केलेले १ लाख ३६ हजार ४०० रुपये किमतीचे ३ हजार ३०० लीटर मिश्रणयुक्त दुर्गंधी द्रव्य व २२ प्लास्टीकचे बॅरल जागीच नष्ट करण्यात आले, तसेच ६ हजार १०० रुपये किमतीचे ॲल्युमिनियमचे दोन टोप व पत्र्याचा झारा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही गावठी हातभट्टी चालविणारा आरोपी प्रदीप रामा शिंगडे (३०) याला पोलिसांनी अटक केली.

# हत्या का मुख्य आरोपी यूपी के भदोही ज़िले से हुआ गिरफ्तार

## चल रहा था फरार, तीनों पकड़ायें, पेल्हार पुलिस की कार्रवाई

**प्रवासी संदेश टीम।**

**वसई।** हत्या के मामले में फरार मुख्य आरोपी को पेल्हार की अपराध प्रकटीकरण शाखा की पुलिस ने यूपी से गिरफ्तार कर लिया है. यह जानकारी एमबीवीवी पुलिस जनसंपर्क अधिकारी प्रवीण बनगोसावी ने शुक्रवार को दी है। कांदिवली के मारुति चाल निवासी सुधीर सिंह (27) और वलईपाड़ा रोड पर उपाध्याय चाली निवासी वैभव मिश्रा (28) 12 जनवरी को कमरे की तलाश में गौराईपाड़ा इलाके में गए थे। इसी दौरान आरोपियों ने उसका अपहरण कर लिया और गौराईपाड़ा इलाके में यादवेश विद्यालय के बगल में खुले पार्किंग स्थल में लकड़ी के बांस और लट्ठबुकी से पीट-पीटकर उसकी हत्या कर दी. इस मामले में पुलिस ने हत्या का मामला दर्ज कर अपराध की जांच शुरू कर दी थी. तीन आरोपी सूरज चव्हाण (25), साहिल विश्वकर्मा (21) और अखिलेश सिंह (27) को पेल्हार की अपराध जांच शाखा की पुलिस ने 12 जनवरी को पुणे के सिंहगढ़ पुलिस स्टेशन की सीमा के तहत आनंद नगर इलाके से भागते समय पकड़ा था। लेकिन वारदात को अंजाम देने के बाद से ही इस वारदात का मुख्य आरोपी राहुल पाल उर्फ मर्दा फरार चल रहा था. वरिष्ठ पुलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी ने वारदात के मुख्य आरोपी राहुल की तलाश के आदेश दिए थे। उक्त आदेश के परिपालन में पेल्हार की अपराध अनुसंधान शाखा के अधिकारियों/प्रवर्तन अधिकारियों ने फरार आरोपियों के संबंध में तकनीकी जानकारी प्राप्त की। चूंकि आरोपी के उत्तर प्रदेश राज्य में होने की संभावना है, इसलिए पेल्हार पुलिस उसका पता लगाने के लिए यूपी के भदोही ज़िला गई। भदोही जिले के चौरीबाजार में आरोपी के बारे में अधिक जानकारी हासिल करने पर उसके रामपुर में होने की पुष्टि हुई। इसी क्रम में पुलिस टीम ने रामपुर पुलिस की मदद से रात में सकरी गांव में आरोपी की तलाश की और जंगल में भागते समय उसे गिरफ्तार कर लिया. यह कार्रवाई पुलिस उपायुक्त जयंत बजबळे, सहायक पुलिस आयुक्त बजरंग देसाई के मार्गदर्शन में पेल्हार के वरिष्ठ पुलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी, पुलिस निरीक्षक (क्राइम) कुमारगौरव धादवड, गुन्हे प्रकटीकरण शाखा के सपुनि सोपान पाटील, पुउपनिरी तुकाराम भोपळे, पुहवा योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अविनाश देसाई, फिरोज तडवी, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, रवि वानखेडे, संजय मासाळ, मिथुन भोईर, निखील मंडलिक, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील, नामदेव ढोणे, सोहेल शेख ने की है।




CamScanner

दैनिक
यशोभूमि

# सुधीर सिंह हत्या मामले में मुख्य आरोपी गिरफ्तार

**यशोभूमि/प्रतिनिधि**

**नालासोपारा।** पेल्हार पुलिस की अपराध शाखा टीम ने गौराई



पाड़ा क्षेत्र में 12 जनवरी को हुई सुधीर सिंह हत्या मामले में मुख्य आरोपी को जौनपुर जिला से गिरफ्तार किया है। यह कार्रवाई डीसीपी (परिमंडल) जयंत बजबले व एसीपी बजरंग देसाई के मार्गदर्शन पुउपनिरी तुकाराम भोपले की टीम ने की है। जानकारी के अनुसार मुंबई उपनगर के कांदिवली, हिंदुस्तान नाका स्थित मारुति चाल निवासी सुधीर कुंजबिहारी सिंह (27) को 12 जनवरी की रात 12:30 बजे के आसपास जबरदस्ती रिक्शा में बैठाकर आरोपियों ने उसकी जमकर पिटाई कर दी और उसके बाद धारदार हथियार से हमला कर उसकी हत्या कर दी थी। शिकायत कर्ता के बयान के आधार पर पुलिस आरोपी रोहन सिंह, मर्दा, एक अन्य के खिलाफ 302,364 आदि कलम के तहत मामला दर्ज कर आगे की कार्रवाई में जुट गई

**मुख्य आरोपी को जौनपुर जिला से गिरफ्तार किया ह**

थी। पुलिस ने तकनीकी जाँच पड़ताल के बाद सूरज लल्लन चव्हाण (25), साहिल तिलकु विश्वकर्मा, अखिलेश सुनील सिंह उर्फ अक्की को 13 जनवरी को गिरफ्तार कर लिया था, जबकि मुख्य आरोपी राहुल पाल उर्फ मर्दा फरार चल रहा था। पुलिस को पता चला की आरोपी जौनपुर जिला के रामपुर क्षेत्र के साकरी गांव में है।



CS CamScanner